**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८**
**मा. फ प्रभाग समिती विशेष सभा(अंदाजपत्रकीय)**
**कार्यपत्रिका क्रमांक –११**

दिनांक :– १५/०२/२०२० **सभावृत्तांत**

वेळ :- दु..१२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दिनांक १५/०२/२०२० रोजी दु.१२.१५ वा.फ प्रभाग कार्यालयाचे "राजर्षी शाहू महाराज" सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.कुंदन अंबादास गायकवाड | सदस्य |
| ३. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्या |
| ४. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्या |
| ५. | मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ६. | मा.संगिता(नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्या |
| ७. | मा.पंकज दत्तात्रय भालेकर | सदस्य |
| ८. | मा.घोलप कमल अनिल | सदस्य |
| ९. | मा.उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| १०. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| ११. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| १२. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |
| १३. | मा.पांडुरंग गुलाब भालेकर | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. वामन नेमाणे- प्रशासन अधिकारी, मा.श्रीकांत सवणे-कार्यकारी अभियंता(स्थापत्य) मा. व्ही.सी.काळे- प्र.कार्यकारी अभियता(जलनिःस्सारण),मा. मोहन निकम-लेखाधिकारी, मा. सतिश वाघमारे-उपअभियंता (स्थापत्य), मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (पा.पु.), मा. किशोर महाजन-उपअभियंता(जलनिःस्सारण), श्री भोईर- ए.एन.-कनिष्ठ अभियंता (जलनिःस्सारण), श्री सलगरकर-मुख्य लिपिक.

मा.सभापती योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली. मा.वामन नेमाणे,प्रशासन अधिकारी व मा.मोहन निकम लेखाधिकारी यांनी सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रक मा.प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर केले.

सर्व सन्मा.सदस्यांनी मुख्य् कार्यालयामार्फत होणारे कामकाजाकरिता करणेत आलेली अंदाजपत्रकिय तरतूद कमी आहे या कारणास्तव् प्रशासनाचा निषेध करुन सभा तहकूबीची मागणी केली.

Scanned with CamScanner

विषय क्र - 1
दिनांक - 15 /02/2020
सुचक- मा.योगिता नागरगोजे

ठराव क्र. - 15
विभाग – लेखा विभाग
अनुमोदक- मा.संगिता ताम्हाणे

संदर्भ-१.मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/नि-४/कावि/३०/२०२० दि.१२/२/२०२०.

फ क्षेत्रिय कार्यालयाचे सन २०१९-२० चे सुधारित सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९(सुधारित नांव THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATION ACT (Act No.LIX of 1949) चे कलम २९ अ मधील कलम ७ चे पोटकलम (ब) नुसार मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

-----------------------------------

यानंतर मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/९३ /२०२० दिनांक २० /०२/२०२०.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
निगडी.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner